# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक १२ मार्च, २०१८ / फाल्गुन २१, १९३९ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **परिवहन, खारभूमी विकास मंत्री** | |
| **(३)** | **कृषी, फलोत्पादन मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(५)** | **पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४७**

---

### सटाणा-मळगाव (ता.बागलाण, जि.नाशिक) येथील पुलाला अवैध उत्खननामुळे निर्माण झालेला धोका

**(१) * ११३२८० श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सटाणा-मळगाव (ता.बागलाण, जि.नाशिक) येथील पुलाजवळ मोठ्या प्रमाणात अवैधरित्या वाळू उपसा करण्यात येत असल्याचे व या अवैध उपशाकडे संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत असल्यामुळे पुलाला धोका निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार सदर पुलाजवळ अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यात आरम नदीवर सटाणा शहरानजिक उभारण्यात आलेल्या सटाणा-मळगांव पुलाजवळ नदीपात्रातून वाळूचे अवैध उत्खनन केल्याबाबत दि.०२/०२/२०१८ रोजी स्थानिक वृत्तपत्रामध्ये बातमी प्रसिध्द झाली होती.

सदरचे उत्खनन बऱ्याच कालावधीपूर्वीचे असून या उत्खननामुळे सदर पुलास तांत्रिकदृष्ट्या धोका नसल्याचे उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद, नाशिक उपविभाग सटाणा यांनी केलेल्या चौकशीमध्ये आढळून आले आहे.

आरम नदीपात्रात वाळूचे अवैध उत्खनन व वाळू साठे करणाऱ्या व्यक्तींना नोटीस देण्यात आल्या असून त्यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.

वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्यासाठी बागलाण तालुक्यासह नाशिक जिल्ह्यात भरारी पथके स्थापन केली असून या भरारी पथकाने माहे एप्रिल,२०१७ ते जानेवारी, २०१८ या कालावधीत बागलाण तालुक्यात गौणखनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ११९ प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करुन रक्कम रु.८३,२८,४८०/- इतका दंड वसूल केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगांव-वीट-झरे-पोपळज (ता.करमाळा, जि.सोलापूर) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(२) * १०७४३९ श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगांव-वीट-झरे-पोपळज (ता.करमाळा, जि.सोलापूर) प्रजिमा-१२६ या रस्त्यावरील कि.मी. १०/०० ते २१/०० मधील रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्यासाठी रुपये ३ कोटी निधी मिळण्याची व रस्त्याचा समावेश गट-ब (ए.एम.सी.) मध्ये करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम गट-ब अंतर्गत समाविष्ट करण्याबाबतचे आदेश मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी सचिव, रस्ते, सार्वजनीक बांधकाम विभाग यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आदेशाच्या अनुषंगाने रस्त्यासाठी निधी मंजूर करून रस्त्याचा समावेश गट-ब (ए.एम.सी) अंतर्गत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्नांकित रस्त्याच्या देखभाल दुरूस्तीच्या कामांसाठी ठेकेदारी निश्चित करण्यात आली आहे. रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरुन रस्ते वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आले आहे.

रस्त्याच्या लांबीपैकी काही लांबीत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे व इतर काम करणे आवश्यक आहे. ही कामे मंजूरी, निधी, निकष व प्राध्यन्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## औसा (जि.लातूर) तालुक्यातील तेरणा व तावरजा नदीपात्रातून होत असलेल्या अवैध वाळू उपशाबाबत

**(३) * ११३३०६ श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि.लातूर) तालुक्यातील तेरणा व तावरजा नदीपात्रातील केवळ हिप्परसोगा वाळू घाटाचा लिलाव होऊन उर्वरित ८ वाळू घाटांचा लिलाव न झाल्याने या रेतीघाटावरून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा होत असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या अवैध वाळू उपशामुळे शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसूलाचे नुकसान होत असून या अवैध वाळू उपशाकडे संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार तेरणा व तावरजा नदीपात्रातील वाळू घाटावरून अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांवर तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) औसा तालुका, जि.लातूर येथील तेरणा, तावरजा व मांजरा नदीपात्रातील एकूण ७ वाळूघाटांचे सर्वेक्षण केल्यानंतर पर्यावरण मंजूरीअंती केवळ हिप्परसोगा हा एकच वाळूघाट लिलावयोग्य ठरविण्यात आला होता. तथापि, लिलावाच्या तीन फेऱ्या पार पडल्यानंतरही हिप्परसोगा या वाळूगटास बोली प्राप्त झालेली नाही. औसा तालुक्यात वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्यासाठी नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी व तलाठी यांचे भरारी पथक स्थापन करण्यात आले असून औसा तालुक्यात माहे एप्रिल, २०१७ ते जानेवारी, २०१८ या कालावधीत १४४ प्रकरणात दंडात्मक कार्यवाही करुन रु.१४,१९,९५०/- इतकी रक्कम शासनजमा करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे मिठमुंबरी-बागवाडी (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथे धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्याबाबत

**(४) * ११३९९५ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मिठमुंबरी-बागवाडी (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे काम राज्य स्तरीय योजना-४७११ पूरनियंत्रण प्रकल्प यावरील भांडवली खर्च अंतर्गत २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आले असून सदर कामाच्या रूपये १.०० कोटी रकमेच्या अंदाजपत्रकासह प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू धूप प्रतिबंधक बंधाऱ्याच्या कामासाठी सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पात रूपये १.०० कोटीची तरतूद करण्यात आली असतानाही अद्यापपर्यंत सदरहू कामास सुरूवात करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार मिठमुंबरी-बागवाडी येथील धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे काम सुरु करून तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय. हे अंशत: खरे आहे. सदर कामाला रु.१.०० कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता दिली असून सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात रु.२१.७४ लक्ष व सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात रु.१७.२१ लक्ष इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. तथापि पर्यावरण विभागाची CRZ मंजूरी अप्राप्त असल्याने पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) पर्यावरण विभागाची CRZ मंजुरी मिळताच पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील २८ गिट्टी खदानांना अवैध परवाने दिल्याबाबत

**(५) * १०६४६९ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील ई-क्लास शासकीय जागेवरील गिट्टी खदानांना शासनाने अवैध ठरविले असून सन २०११ पासून नवीन परवाने न देण्याबाबतचा अध्यादेश काढला असताना व न्यायालयाने देखील तसे निर्देश दिले असताना सदर अध्यादेशाची अंमलबजावणी न करता अमरावती जिल्हा प्रशासनाने २८ गिट्टी खदानांना परवाने दिल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार अवैधरित्या उत्खनन करित असलेल्या या गिट्टी खदानांवर तसेच शासनाचे नियम डावलून परवानगी देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) जिल्हाधिकारी, अमरावती कार्यालयामार्फत ई-क्लास/गायरान जमिनीवर ११ प्रकरणांमध्ये नवीन खानपट्टे मंजूर करण्यात आले होते. तसेच ८ प्रकरणांमध्ये खाणपट्टा नुतनीकरणाची कार्यवाही करण्यात आली होती. सदर खाणपट्टे शासकीय ई-क्लास/गायरान जमिनीवर असल्याने शासनाच्या दि.१२/७/२०११ च्या शासन निर्णय व शासन अधिसूचना दि.२६/४/२०१७ नुसार महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४/२०१७ अन्वये महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ मध्ये समाविष्ट कलम २२ अ मधील तरतुदीनुसार संबंधित खाणपट्टाधारकांना खाणपट्टा करारनामा संपुष्टात

आणण्याबाबत जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडून दि.२१/०९/२०१७ रोजी नोटीसा देण्यात आल्या. सदर नोटीसीविरुध्द ८ खाणपट्टाधारकांनी मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेल्या याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या दि.२१/९/२०१७ च्या नोटीसीस स्थगिती दिली असून सदरचे ८ खाणपट्टे सद्यस्थितीत सुरु आहेत. उर्वरित ११ खाणपट्टे जिल्हाधिकारी, अमरावती यांनी त्यांच्या दि.३/११/२०१७ रोजीच्या आदेशान्वये रद्द केले आहेत. तसेच शासकीय जी-वर्ग जमीनीवरील ५ व एफ-क्लास जमिनीवरील २ असे एकूण ७ खाणपट्टे सुरु आहेत.

अमरावती जिल्ह्यामध्ये शासकीय ई-क्लास/गायरान जमिनीवर गौणखनिज उत्खननाकरीता दिनांक ०३/११/२०१७ नंतर खनिपट्टे तसेच तात्पुरते परवाने मंजूर करण्यात आलेले नाहीत. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत प्रकरणी कोणत्याही अधिकाऱ्याविरुध्द कारवाई करण्यात आली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राणसावरगांव ते पालम मार्गे सिरसम (ता.पालम, जि.परभणी) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(६) * १०७४२१ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राणसावरगांव ते पालम मार्गे सिरसम (ता.पालम, जि.परभणी) या रस्त्याची दुरवस्था होऊन रस्ता वाहतुकीस अयोग्य झाल्याने रस्त्याची दुरुस्ती व डांबरीकरण करण्याबाबतची मागणी स्थानिक रहिवाशांनी व लोकप्रतिनिधीनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, जिल्हाधिकारी, परभणी व

कार्यकारी अभियंता व सचिव (रस्ते) सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे दिनांक ३० ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार व लोकप्रतिनिधीच्या मागणीनुसार राणसावरगांव ते पालम या रस्त्याची दुरुस्ती व डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. अशा आशयाचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.

(२) व (३) प्रश्नाधीन रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम पूर्ण करण्यात आले असून वाहतूक सुरळीत चालू आहे. दुरूस्तीची आवश्यक कामे मंजूरी, निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चांदवड व देवळा (जि.नाशिक) येथील बस स्थानकांचे नुतनीकरण करण्याबाबत

**(७) * ११४०२३ डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील चांदवड व देवळा ही महत्वाची बसस्थानके असून ती मोडकळीस आली असल्याचे तसेच बसस्थानकात मोठ्या प्रमाणात कचरा पसरल्याने या कचऱ्यापासून दुर्गंधी निर्माण होऊन प्रवासी तसेच इतर नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चांदवड व देवळा येथे देशाच्या विविध भागातून मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असून येथील मोडकळीस आलेल्या बसस्थानकाचा व कचऱ्याचा त्यांनाही मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बस स्थानकातील अस्वच्छता दूर करुन तातडीने इमारतीचे नुतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) नाही.

(३) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस, बसस्थानके, कार्यालये, निवासस्थानांची सामाईक जागा, चालक/वाहक विश्रांतीगृह, अतिथीगृह, पाण्याच्या टाक्या इ. ची स्वच्छता प्रभावीपणे होण्यासाठी राज्य स्तरावर ब्रिक्स इंडिया लि. या संस्थेची अलीकडेच नेमणूक करण्यात आली असून, त्यांनी स्वच्छतेचे काम चालू केले आहे. तसेच, चांदवड व देवळा येथील बसस्थानके जुनी झाल्यामुळे तेथे अद्ययावत बसस्थानके बांधण्यासाठी तज्ञ वास्तुविशारद यांची नेमणूक करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दहीवडी (ता.माण, जि.सातारा) येथील माणगंगा नदीवरील पुलाचे रुंदीकरण करण्याबाबत

**(८) * ११२४९६ श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहीवडी (ता.माण, जि.सातारा) येथील माणगंगा नदीवरील पूल अरुंद असून पूलाजवळ धोकादायक वळण असल्यामुळे याठिकाणी अनेकदा लहान मोठे अपघात होऊन त्यात अनेक नागरिकांचा बळी जात असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार माणगंगा नदीवरील पुलाचे रुंदीकरण करून येथील धोकादायक वळणावर अपघात घडू नये म्हणून उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

या पूलाच्या ठिकाणी पूल अरुंद व वळण धोकादायक असल्याने अपघात झाल्याची नोंद पोलिस दप्तरी नाही

(२), (३) व (४) प्रश्नाकिंत पूल हा अहमदनगर-मठेवडगाव-काष्टी-दौंड-बारामती-फलटण-दहिवडी-मायणी-विटा-तासगाव सांगली अंकली रस्ता रा.मा.६० वर कि.मी.१७८/८०० मध्ये आहे. पूल वाहतूकीसाठी सुस्थितीत आहे. प्रस्तुत रस्ता केंद्र शासनाने रा.म.क्र.१६० म्हणून घोषित केला आहे. या रस्त्याचे हस्तांतरण केंद्र शासनाकडे करण्यात येणार असून रस्त्याची सुधारणा करण्याचे काम केंद्र शासनामार्फत होणे अपेक्षित आहे.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील रेती व भूमाफियांवर कारवाई करण्याबाबत

**(९) * १०७६४९ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी, कल्याण, मुंब्रा व डोंबिवली येथील खाडीकिनाऱ्यावर रेती व भूमाफियांकडून सीआरझेडचे उल्लंघन करुन रेतीचा उपसा करणे, मोठ्या प्रमाणात भर टाकून खाडी बुजवून बेकायदा बांधकामे करणे तसेच खाडी किनाऱ्यावरील खारफुटीची मोठ्या प्रमाणात तोड करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणच्या बेकायदा बांधकामावर कारवाई करून रेती व भूमाफिया यांचे विरुध्द एमपीडीए आणि मोक्कासारख्या कायदयांतर्गत गुन्हे दाखल करण्याचे निर्देश मा.पालकमंत्री, ठाणे यांनी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार ठाणे जिल्ह्यातील विविध खाडी किनारी अवैध उत्खनन तसेच भराव टाकून खाडी बुजविणाऱ्या रेती व भूमाफियांवर एमपीडीए आणि मोक्का कायदयांतर्गत कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) ठाणे जिल्ह्यातील काही ठिकाणी खाडी किनाऱ्यावर अवैध रेती उत्खननाची तसेच बेकायदेशीर बांधकामांची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली असून अवैध रेती उत्खनन करणाऱ्यांवर तसेच अशा बेकायदेशीर बांधकामांवर वेळोवळी कार्यवाही करण्यात आली आहे. मात्र खाडी किनाऱ्यावर खारफुटीची मोठ्या प्रमाणात तोड करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) एप्रिल २०१७ ते जानेवारी २०१८ या कालावधीत ठाणे तालुक्यातील अवैध रेती वाहतुकीच्या २१८ प्रकरणांत दंडात्मक कारवाई करून रू. ५८.८९ लाख रक्कम वसूल करण्यात आली असून अवैध रेती उत्खननाच्या ६ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मुंब्रा खाडी किनाऱ्यालगत खाडी बुजवून केलेली ८३७ बेकायदा बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत.

कल्याण तालुक्यातील अवैध रेती वाहतुकीच्या १०० प्रकरणांमध्ये दंडात्मक कारवाई करून रू.१९.७७ लाख रक्कम वसूल केली व अवैध रेती उत्खनन प्रकरणी १९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मौजे गावदेवी येथे खाडी किनाऱ्याच्या गुरचरण जमिनीवर असलेल्या पाच चाळीतील ३८ अनधिकृत खोल्या व ५ कच्चे पायाचे बांधकाम निष्कासित करण्यात आले आहेत. तसेच कल्याण तालुक्यात कांदळवन नष्ट केल्याप्रकरणी ४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

भिवंडी तालुक्यात रेतीच्या अवैध उत्खननाच्या १२ प्रकरणांत गुन्हे दाखल करण्यात आले असून गौण खनिजाच्या अवैध वाहतुकीच्या १३७ प्रकरणात दंडात्मक कारवाईद्वारे रू.३९.३६ लाख रक्कम वसूल करण्यात आली आहे. भिवंडी तालुक्यात कांदळवनाचा ऱ्हास रोखण्यासाठी मौजे कशेळी व मौजे दिवे (अंजूर) येथील खाजण जमिनीच्या हद्दीलगत संरक्षक भिंत बांधण्यात आली आहे.

ठाणे जिल्ह्यात माहे एप्रिल २०१७ ते २५ फेब्रुवारी २०१८ या कालावधीत अवैध गौण खनिज वाहतूकीच्या २२१४ प्रकरणी दंडात्मक कारवाईद्वारे रू.५४१.१२ लाख रक्कम वसूल करण्यात आली असून गौण खनिजाचे अवैध उत्खनन प्रकरणी ३७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच एका वाळू तस्कराविरूध्द महाराष्ट्र झोपडपट्टी दादा, हातभट्टीवाले,

औषधीद्रव्य विषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील शासकीय भूखंड भूमाफियांनी बळकाविल्याबाबत

**(१०) * १११६२२ श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या कार्यकक्षेतील व अधीक्षक, भूमी अभिलेख, ठाणे, नगर भूमापन अधिकारी, ठाणे यांच्या दप्तरी नोंद असलेली टीका नं. न.भू.क्र. ६०, ६१ व ६२ या मिळकतीच्या मध्ये असलेला शासनाचा एल आकाराचा दहा कोटी रुपये किंमत असलेला भूखंड येथील भूमाफियांनी बळकावून त्यावर महापालिकेकडून डी.पी. प्लान मंजूर करून घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील नागरिकांनी भू-मापन अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार करूनही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार उक्त भूखंड बळकाविणाऱ्या भूमाफियांवर तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) अशा आशयाची तक्रार अर्जदार श्री.जमील अहमद अब्दुलरब शेख या व्यक्तीकडून उप संचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश यांच्याकडे प्राप्त झाली होती. सदर तक्रार पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख, ठाणे यांना

प्राप्त झाली. उक्त तक्रारीच्या अनुषंगाने नव्याने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २०(२) अन्वये सखोल चौकशी करुन गुणवत्तेवर निर्णय घेण्याचे आदेश नगर भूमापन अधिकारी, ठाणे यांना दिनांक २७/०९/२०१७ रोजी जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख, ठाणे यांनी दिले आहेत. त्यानुषंगाने नगर भूमापन अधिकारी, ठाणे यांच्यामार्फत उक्त कलम २०(२) ची चौकशी सुरु असून चौकशी पूर्ण झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

-----------------

## मौजे विजयपूर व चिखले (ता.वाडा, जि.पालघर) येथे मे. ग्रासीम इंडस्ट्रीज लि. कंपनीने अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(११) * ११३२७० श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे विजयपूर व मौजे चिखले (ता.वाडा, जि.पालघर) या दोन्ही गावांच्या हद्दीतील (विजयपूर) सर्व्हे नं.९४/१, ९५/३, ९५/५, (चिखले), सर्व्हे नं.६१/१, ६१/२ मधील नैसर्गिक नाल्यावर मे. ग्रासीम इंडस्ट्रीज लि. (मे. अल्ट्राटेक सिमेंट लि.) कंपनीने माती भरणा करून अनधिकृतपणे इमारतीचे बांधकाम केल्यामुळे येथील शेतकऱ्यांनी मा.राज्यमंत्री, महसूल यांना दिलेल्या तक्रारवजा निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर यांनी चौकशी करून तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तहसिलदार, वाडा यांनी स्थळपाहणी केली असता नाल्यामध्ये अनधिकृत व बेकायदेशीरपणे मातीचा भरणा केल्याचे आढळून आल्यामुळे रुपये ७,६४,४०,२०० दंड आकारून आठ दिवसाच्या आत अनधिकृत बांधकाम निष्कासीत करुन नाला पूर्ववत करण्याबाबत आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आदेशाच्या अनुषंगाने सदरचे अनधिकृत बांधकाम निष्कासीत करुन कंपनीकडून दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत तसेच संबंधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) सदर कंपनीने तहसीलदार, वाडा यांच्या नोटीसीविरुध्द मा.दिवाणी न्यायालय, भिवंडी येथे दावा क्र.१८०/२०११ दाखल केला असता. मा.न्यायालयाने "जैसे थे" परिस्थिती ठेवण्याबद्दल आदेश दि.८/४/२०११ रोजी दिले आहेत. सदर प्रकरण मा.न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बंद पडलेल्या औद्‌योगिक प्रकल्पांच्या जमिनींवर परवडणारी घरे बांधण्याबाबत

**(१२) * १०५००४ श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजय पुराम (आमगाव), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय**

**भरणे (इंदापूर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नारायण पाटील (करमाळा), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-(१) राज्यातील बंद पडलेल्या औद्योगिक प्रकल्पांच्या विनावापर असलेल्या जमिनींवर परवडणारी घरे बांधण्याबरोबरच त्या ठिकाणी रोजगार निर्मितीलाही प्राधान्य देण्याचा निर्णय दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध कंपन्यांनी शासनाच्या माध्यमातून स्वखर्चाने सन १८९४ च्या भूसंपादन अधिनियमानुसार जमिनी संपादित करुन त्यावर सन १९७० अथवा त्यापुर्वीपासून उद्योग सुरु केले आहेत, मात्र सदर उद्योग विविध कारणामुळे बंद पडले असून प्रदुषणामुळे अनेक उद्योग शहराबाहेर स्थलांतरीत झाले असल्यामुळे या कंपन्यांनी घेतलेल्या वित्तीय संस्थांची कर्जे, कामगारांची देणी, जमिनींच्या विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा किंवा हस्तांतराबाबतचे प्रस्ताव शासनाकडे निर्णयासाठी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बंद पडलेल्या कंपन्यांच्या जमिनींचा योग्य वापर होण्यासाठी शासनाने अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) सद्यस्थितीत, शासन स्तरावर असे कोणतेही प्रस्ताव प्रलंबित नाहीत.
(३) व (४) होय, हे खरे आहे.

औद्योगिक प्रयोजनासाठी संपादित केलेल्या जमिनीची विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा किंवा हस्तांतरण करणे तसेच जमिनीच्या विक्री / वापरात बदल करणे यासाठी संबंधित ठिकाणाचा झोन बदल होणे किंवा कंपनी डबघाईस येणे या व इतर कारणांमुळे विक्री व इतर कारणांसाठीचे प्रस्ताव शासनास प्राप्त होत असतात. त्यानुषंगाने घ्यावयाच्या निर्णयांमध्ये सुसूत्रता राहण्यासाठी यासंदर्भात भूसंपादन अधिनियम,१८९४ मधील भाग-सात खाली औद्योगिक प्रयोजनासाठी संपादित जमिनीच्या विक्री / वापर बदलाच्या अनुषंगाने सर्वकष धोरण निश्चित करण्यासाठी शासनास शिफारस करण्याबाबत अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय, दि.२६.१२.२०१६ दि.११.०१.२०१७ अन्वये समिती गठित करण्यात आली होती.

सदर समितीने शासनास सादर केलेल्या शिफारशी अहवालाचा सर्वंकष विचार करुन शासन निर्णय, दि.११.०१.२०१८ नुसार धोरण निश्चित करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळकोट (जि.लातूर) तालुक्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाची भरपाई देण्याबाबत

**(१३) * ११३३७९ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळकोट (जि.लातूर) तालुक्यात दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास अतिवृष्टी होवून नदीकाठची हजारो हेक्टर जमीन पिकांसह वाहून गेली असून त्याबाबतचे पंचनामे करुनही त्या शेतकऱ्यांना अद्यापही शासनाची मदत मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, या परिसरातील मंगरूळ येथील एक पाझर तलाव फुटून शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे देखील निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन संबंधित शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्याबाबत व नुकसान भरपाई देण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) शासन निर्णय दिनांक ९ जानेवारी, २०१७ अन्वये राज्यात माहे जून ते ऑक्टोबर, २०१६ च्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत मंडळनिहाय भरपाईची जी रक्कम देय असेल त्या रकमेच्या ५० टक्के रक्कम प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी न झालेल्या शेतकऱ्यांना २ हेक्टरच्या मर्यादेत मदत म्हणून देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने क्षेत्रिय कार्यालयांकडून निधी मागणीबाबतचा एकत्रित प्रस्ताव संकलीत करण्याचे काम प्रगतीपथावर असून, सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यासंबंधीची कार्यवाही करण्याची बाब विचाराधिन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हयातील १०७ गावांतील शेतकरी पीक विम्यापासून वंचीत असल्याबाबत

**(१४) * ११३४७१ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयात राज्य शासनाच्या पंतप्रधान पीक विमा योजनेंतर्गतच्या पोर्टलवर १०७ गावांची नावे नसल्याने ५० हजार शेतकरी पीक विम्यापासून वंचित राहिले असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, यादीत नसलेल्या १०७ गावांच्या शेतकऱ्यांचा पिक विमा बँकेने विमा कंपनीला पाठविलेला असतानाही विमा कंपनीकडून याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार उक्त १०७ गावांतील शेतकऱ्यांना पिक विमा मंजुर करुन पिक विम्याची रक्कम देण्याबाबत तसेच संबंधित विमा कंपनीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) पिक विमा पोर्टलवर नसलेल्या नांदेड जिल्हयातील १०७ गावातील शेतकऱ्यांचे विहित मुदतीत प्राप्त झालेले विमा प्रस्ताव बँकांमार्फत स्वीकारुन

पिक विमा पोर्टलवर अपलोड करण्यात आले आहेत व विमा कंपनीमार्फत स्विकारण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोरीबेल-रावणगाव, नानगाव-गार-दौंड व यवत स्टेशन-तांबेवाडी (ता.दौंड, जि.पुणे) या रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(१५) * ११२००१ श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीबेल-रावणगाव, नानगाव-गार-दौंड, यवत स्टेशन-तांबेवाडी (ता.दौंड, जि.पुणे) या रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नानगाव-गार-दौंड हा रस्ता अष्टविनायक परिक्रमा मार्गात समाविष्ट असलेला रस्ता असून त्यासाठी निधी मंजूर झालेला असतानाही अद्याप रस्त्याचे काम सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बोरीबेल-रावणगाव व यवत स्टेशन-तांबेवाडी रस्त्याच्या दुरुस्तीची मागणीही स्थानिक लोकप्रतीनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दौंड तालुक्यातील उक्त रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्रश्नांकित रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे भरुन रस्ते वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आले आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

सुधारणेच्या कामाच्या निविदा बोलावण्यात आल्या असून निविदा अंतिम टप्प्यात आहे. निविदा स्वीकृत करुन काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) अशा प्रकारची निवेदने सा.बां.विभाकडे प्राप्त नाहीत.

प्रश्नांकित रस्ता ग्रा.मा.२८ असून रस्ता जि.प.पुणे यांच्या अखत्यारीत आहे.

(४) व (५) प्रश्नांकित रस्त्यापैकी रावणगाव बोरीवेल देऊळगाराजा रस्ता प्रजिमा ८० असून लांबी १६.२०० कि.मी.आहे. नानगाव-गार-दौंड रस्ता रा.मा.६८ असून लांबी २९.५०० कि.मी. आहे. हे दोन्ही रस्ते सा.बां.विभागाच्या अखत्यारीत असून रस्त्यांच्या डांबरी पृष्ठाभागावरील खड्डे भरुन रस्ते वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आले आहेत. या रस्त्याच्या काही लांबीत मजबूतीकरण व डांबरीकरणाची कामे मंजूर असून हाती घेण्यात येत आहेत.

यवत स्टेशन ते तांबेवाडी रस्ता ग्रा.मा.२८ आहे. रस्ता जि.पुणे यांच्या अखत्यारीत आहे.

-----------------

## कौठुळी (ता.आटपाडी, जि.सांगली) येथील माण नदीवर पूल बांधण्याबाबत

**(१६) * १०९३२७ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कौठुळी (ता.आटपाडी, जि.सांगली) येथील माण नदी ओलांडण्याकरिता नदीवर पूल नसल्याने ग्रामस्थांना नदी ओलांडणे गैरसोयीचे झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नदीवर उक्त ठिकाणी पूल बांधल्यास ग्रामस्थांचे प्रवासाचे अंतर कमी होऊन प्रवास करणे सोईचे होणार असल्याने त्याबाबतची मागणी ग्रामस्थांनी अनेक वर्षांपासून केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार कौठुळी येथे माण नदीवर पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) प्रस्तूत पूलाचे काम निकष, मंजूरी व निधीच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कडाव बाजारहाटी (जि.रायगड) गावातील कर्जत-मुरबाड राज्यमार्गावरील अतिक्रमण निष्कासीत करण्याबाबत

**(१७) * ११३९७४ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत-मुरबाड राज्यमार्गावरील कडाव बाजारहाटी (जि.रायगड) गावाच्या बाजारपेठेत दुतर्फा अतिक्रमण झाले असल्याने तसेच या मार्गावर होणाऱ्या अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे उक्त ठिकाणी सतत वाहतुकीची कोंडी तसेच अपघात होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यावरील अतिक्रमण निष्कासीत करण्याबाबत स्थानिक नागरिकांनी तसेच लोकप्रतिनिधीनी सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग यांच्याकडे वारंवार तक्रारी केल्या असतानाही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर रस्त्यावरील कडाव बाजारहाटी गावाच्या हद्दीतील अतिक्रमण निष्कासीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

सदर राज्यमार्गावर वाहतुक कोंडी होते, ही बाब खरी आहे. परंतु त्या ठिकाणी अतिक्रमण झालेले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील अनधिकृत रिसॉर्ट बंद करण्याबाबत

**(१८) * १०५१६१ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्याच्या विविध भागामध्ये मोठ्या प्रमाणात अनधिकृत रिसॉर्ट सुरु असुन सदर बेकायदेशीर रिसॉर्ट बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिनांक ३० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास सर्व प्रांताधिकाऱ्यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशाच्या अनुषंगाने याबाबत चौकशी करून पालघर जिल्ह्यातील अनधिकृत रिसॉर्ट बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) पालघर जिल्ह्यातील अनधिकृत रिसॉर्ट च्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर यांनी आयुक्त, वसई-विरार,

महानगरपालिका, अपर पोलीस अधिक्षक, वसई तसेच उप विभागीय अधिकारी, वसई यांना याबाबत चौकशी करुन कारवाई करण्याबाबत निर्देश डिसेंबर, २०१७ मध्ये दिले आहेत. वसई-विरार उपप्रदेशातील २१ महसुली गावांकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून वसई-विरार शहर महानगरपालिकेची नियुक्ती शासनाने केलेली आहे. सदर भागातील अनधिकृत रिसॉर्टस संदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक व नियोजन अधिनियम, १९६६ अंतर्गत कारवाई सुरु आहे.

-----------------

## नरखेड (जि.नागपूर) तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(१९) * १०५२३८ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरखेड (जि.नागपूर) तालुक्यातील संत्रा पिकाचे पावसाची अनियमितता व रोगाचा प्रदुर्भाव झाल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असुन या शेतकऱ्यांनी फळपीक विमा काढलेला असतानाही त्यांना विम्याची रक्कम मिळाली नसल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तालुक्यातील फळपीकांची पाहणी करुन पंचनामे शासनाने केले आहेत काय,

(३) असल्यास, त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजना सन २०१७-१८ मध्ये विमा कंपनीला विम्याची राज्य हिस्याची रक्कम अदा केलेली असून लागू झालेले हवामान धोके विचारात घेवून विमा कंपनीची नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंढरपूर व मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यात रस्ते दुरुस्तीच्या निविदेत झालेला गैरव्यवहार

**(२०) * ११०८९७ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर व मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील रस्त्यावरील खड्डे बुजविण्याच्या कामांबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने काढलेल्या निविदेमध्ये अनेक अनियमितता व गैरव्यवहार झाल्याबाबतची तक्रार लोकप्रतिनिधी, पंढरपूर यांनी अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, यांच्याकडे दिनांक ०१ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रस्त्यांच्या निविदेतील गैरव्यवहाराबाबत लोकप्रतीनिधींनी तक्रार करून सुद्धा उक्त प्रकरणी अद्यापी चौकशी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत तातडीने चौकशी करुन दोषी असणाऱ्या संबंधित अधिकारी व कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. हे खरे आहे.

(२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणी दक्षता व गुणनियंत्रण मंडळ पुणे यांच्यामार्फत चौकशी प्रगतीत आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यातील निष्कर्षानुसार उचित कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील श्रीक्षेत्र जोतिबा घाट रस्त्याला संरक्षक कठडे बांधण्याबाबत

**(२१) * १११७३२ श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील श्रीक्षेत्र जोतिबा घाट रस्त्यावर असलेल्या धोकादायक वळणामुळे व रस्त्यावर संरक्षक कठडे नसल्यामुळे रस्त्यावरून प्रवास करणे गैरसोयीचे झाले असून अपघात घडून अनेक नागरिकांचा मृत्यू होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार या घाट स्त्याच्या धोकादायक वळणावर अपघात घडू नये म्हणून उपाययोजना करण्याबाबत तसेच घाट रस्त्याला संरक्षक कठडे बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्रश्नांकित घाटात रस्त्याच्या दोषामुळे अपघात झाल्याची नोंद पोलिस दप्तरी नाही.

(२), (३) व (४) प्रश्नांकित घाट रस्ता रा.मा. २०४ (केर्ली) ते जोतिबा-गिरोली रस्ता प्रजिमा ११ चा भाग आहे. घाटातील वळणावरच्या संरक्षक भिंती दुरुस्ती करणे नवीन भिंती बांधणे, क्रॅश बॅरीयर बसवण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदर काम निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

सद्य:स्थितीत रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे.

-----------------

## नेवासा फाटा ते ज्ञानेश्वर मंदिर (ता.नेवासा, जि.अहमदनगर) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(२२) * १०७९२५ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देहू, आळंदी व पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत नेवासा फाटा ते ज्ञानेश्वर मंदिर (ता.नेवासा, जि.अहमदनगर) रस्त्याचे काम पूर्ण होऊन केवळ दोन वर्षाचा कालावधी झाला असताना या रस्त्यावर खड्डे पडले असून तातडीने रस्त्याची दुरुस्ती न केल्यास तेथील ग्रामस्थांनी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नेवासा यांना माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) व (३) प्रश्नाधीन रस्त्यावर अतिवृष्टीमुळे काही प्रमाणात खड्डे पडले होते. सदर रस्त्याच्या कामाचा दोषदायित्व कालावधी सुरू असल्याने संबंधीत कंत्राटदारामार्फत खड्डे त्यांच्या खर्चाने भरण्यात आले असून वाहतुक सुरळीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील सावित्रीनदी बाणकोट खाडीपात्रातील अवैध वाळू उत्खननामुळे आंबेत-म्हप्रळ पुलाला धोका निर्माण झाल्याबाबत

**(२३) * १११४१५ श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा),**

**श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड व रत्नागरी जिल्ह्यातील सावित्रीनदी बाणकोट खाडीपात्रातील संयुक्त रेती गटात वाळू माफियांमार्फत सीसीटीव्ही यंत्रणा बंद करुन अहोरात्र ड्रेजर्सद्वारे मोठ्या प्रमाणात अनधिकृतपणे वाळू उत्खनन सुरु असल्याने रत्नागिरी व रायगड जिल्ह्यांना जोडणाऱ्या आंबेत-म्हप्रळ खाडी पूलाला धोका निर्माण झाला असून त्यामुळे पूल कोसळून जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता निर्माण झाल्याचे तसेच याबाबत छावा मराठा संघटनेच्या संस्थापकांनी प्रांत अधिकारी यांच्याकडे तक्रार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील वाळू माफिया विना रॉयल्टी रेतीची वाहतूक व विक्री करत असल्यामुळे शासनाच्या लाखो रुपयांच्या महसूलाचे नुकसान होत असतानाही महसूल प्रशासनाकडून अद्यापपर्यंत त्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील वाळू माफियांविरोधात कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, रत्नागिरी जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागील ६ महिन्यांपासून सातत्याने केली असतानाही अद्यापपर्यंत संबंधिताकडून कोणतीही कारवाई केली नसल्याने म्हप्रळ तरीबंदर येथे बेमुदत साखळी उपोषणाला बसण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीनुसार बाणकोट खाडीपात्रातील संयुक्त रेती गटात अवैध उत्खनन करणाऱ्यांवर तसेच त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) असे निदर्शनास आले नाही.

(३) सावित्रीनदी/बाणकोट खाडीमध्ये झालेल्या लिलावाचा लिलावधारक अटी व शर्तींचा भंग करुन रेती उत्खनन व वाहतूक करत असल्याने त्याचेविरुध्द कार्यवाही करण्याची मागणी करणारे व अशी मागणी मान्य झाली नाही तर बेमुदत साखळी उपोषणास बसणार असल्याबाबतचे दि.२५/०१/२०१८ रोजीचे निवेदन विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना प्राप्त झाले आहे.

(४) सदरचे निवेदन जिल्हाधिकारी, रायगड व रत्नागिरी यांना निवेदनाच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाहीसाठी व निवेदनकर्त्यांना उपोषणापासून परावृत्त करण्यासाठी पाठविले आहे.

निवेदनकर्त्याने दि.४/२/२०१८ रोजी त्यांनी सदरचे उपोषण स्थगित केल्याचे पोलीस निरीक्षक, मंडणगड आणि तहसीलदार, मंडणगड यांना कळविले आहे.

(५) बाणकोट खाडीपात्रातील संयुक्त रेतीगटातून रेतीचे अवैध उत्खनन होत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एलईडी लाईटचा वापर करुन मासेमारी करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२४) * ११००८० श्री.संजय कदम (दापोली), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन),**

**ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने देशाच्या किनारपट्टीवर एलईडी लाईटचा वापर करून केल्या जाणाऱ्या मासेमारीवर दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ रोजी बंदी घातली असुन राज्यांच्या किनारपट्टीवर राज्य मत्स्य विभागास, समुद्रात १२ नॉटिकल मैलाच्या बाहेर सुरू असलेल्या एलईडी लाईट मासेमारीवर कारवाईचे अधिकार कोस्ट गार्डला देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मच्छीमार संस्थेचे सदस्य असणाऱ्या गटाकडून एलईडी लाईटचा वापर करून मासेमारी होत असल्यास संबंधित संस्थेने त्यावर कारवाई करून एलईडी लाईट मासेमारी बंद करावी अन्यथा ज्या मच्छीमार संस्थेच्या गटाकडून एलईडी लाईटचा वापर सुरू आहे त्या संस्थेवर कारवाई करण्यासंबंधीचे आदेश मत्स्य आयुक्तांनी काढले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्यात एलईडी लाईट वापरुन मासेमारी सुरु असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधीच्या नेतृत्वाखाली पारंपारिक मच्छीमारी करणाऱ्या मच्छीमारांनी मत्स्यव्यवसाय कार्यालयावर दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास मोर्चा काढला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या किनारपट्टीवर एलईडी लाईटचा वापर करून मासेमारी करत असलेल्या गोवा राज्यातील तीन पर्ससीन नौका मालवण येथील स्थानिक मच्छीमारांनी दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी पकडून किनारपट्टीवर आणल्या, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कोकणातील मच्छिमारीवर उदरनिर्वाह करणाऱ्या मच्छिमारांना संरक्षण देण्याबाबत व सागरी संपत्तीवर परिणाम करणाऱ्या धोकादायक एलईडी लाईटचा वापर करून पर्ससीन बोटीद्वारे मासेमारी करणाऱ्यांना प्रतिबंध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे आहे.

(२) ज्या मच्छीमार संस्थेच्या गटाकडून एलईडी लाईट वापरून मासेमारी सुरु आहे त्या संस्थेवर कारवाई करण्याबाबत सर्व मच्छिमार सहकारी संस्थांना

आयुक्त, मत्स्य यांच्या दि. १६.०१.२०१८ रोजीच्या पत्रान्वये अवगत करण्यात आले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) एलईडी लाईटचा वापर करून बेकायदेशीर पर्ससीन बोटीद्वारे मासेमारी करणाऱ्या मच्छि व्यवसायाला प्रतिबंध करण्यासाठी जिल्हा सल्लागार समितीचे अभिप्राय घेण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्याची कार्यवाही सुरु असून, त्यापैकी सिंधुदुर्ग, मुंबई-शहर या दोन जिल्ह्यातुन आवश्यक ठराव प्राप्त झालेले आहेत. उर्वरीत जिल्ह्यांमधुन सल्लागार समित्यांची सभा आयोजित करणेबाबत कार्यवाही चालू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मिरज (जि.सांगली) येथील बाह्यवळण रस्त्यासाठी नियमबाह्यरित्या जमिनींचे अधिग्रहण सुरु असल्याबाबत

**(२५) * १०७३२७ श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज (जि.सांगली) येथून जाणाऱ्या रत्नागिरी राष्ट्रीय महामार्गावरील बाह्यवळण रस्त्यासाठी येथील शेतकऱ्यांच्या जमिनींचे नियमबाह्यरित्या अधिग्रहण सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जमीन अधिग्रहण करताना शेतकऱ्यांचे नुकसान न होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

जमीन अधिग्रहणाचे काम राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ मधील तरतुदीनुसार करण्यात येत आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) याबाबत नॅशनल हायवेने जी अलाइनमेंट (नकाशा) सादर केलेला आहे, त्यानुसार राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ अन्वये भूसंपादनाची कार्यवाही करण्यात येत आहे.

राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ च्या कलम ३(G) नुसार भूसंपादन होणाऱ्या गावातील जमिनीची नुकसानभरपाई निश्चित करण्याची कार्यवाही प्रचलित नियमानुसार सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अनुस्कुरा (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) घाट रस्त्याला संरक्षक कठडे बसविण्याबाबत

**(२६) * ११३४९९ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुस्कुरा (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) घाट रस्ता तळकोकणाला जोडणारा महत्वाचा घाट रस्ता असून या तीव्र उताराच्या घाट रस्त्यावर दरडी कोसळण्याचे प्रमाण वाढले असल्याचे तसेच रस्त्यावरील संरक्षक कठडेही तुटल्यामुळे रस्ता धोकादायक झाला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे नागरिकांना प्रवास करणे गैरसोयीचे झाले असून संरक्षक कठड्याअभावी अपघात घडून जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त घाट रस्त्यावर दरडी कोसळू नये म्हणून उपाययोजना करण्याबाबत तसेच रस्त्याला संरक्षक कठडे बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि प्रश्नांकित घाट विठापेठ-मलकापूर-अनुस्कुरा-ओणी-साटवली पावस रस्ता रा.मा. १५० चा भाग आहे. घाट रस्त्याची लांबी ७.६ कि.मी. आहे. पावसाळयात काही ठिकाणी अत्यल्प प्रमाणात दरडी कोसळतात. त्या तातडीने दुर करण्यात येतात. घाट रस्ता सद्य:स्थितीत वाहतुकीस सुस्थितीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**म्हातवली (ता.उरण, जि.रायगड) येथे बेकायदेशीर बांधकाम केल्याबाबत**

**(२७) * १०६१०४ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हातवली (ता.उरण, जि.रायगड) ग्रामपंचायत क्षेत्रातील भूमीहीनांना पंतप्रधान अनुदान योजनेंतर्गत देण्यात आलेल्या जागांचे तसेच गट क्रमांक ९० ते ९५ चे बनावट ७/१२ उतारे बनवून या जागेवर बांधकामे सुरु केल्यामुळे सदर बांधकामे बेकायदेशीर ठरवून बनावट सातबारे तयार करणाऱ्या भूमाफियांविरुध्द कारवाई करणेबाबत तहसिलदारांनी दिनांक २५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास संबंधित उपसचिवांना लेखी कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बांधकाम बेकायदेशीर असल्याबाबतचा अहवाल संबंधित गटविकास अधिकारी व तहसिलदारांनी सादर केला असतानाही मंत्रालयातील वरिष्ठ पातळीवरुन या भूमाफियांना रद्द करण्यात आलेल्या बेकायदेशीर ७/१२ च्या उताऱ्यावरील जागेवर बांधकामास पुन्हा परवानगी देण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तहसिलदार व गटविकास अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालात म्हातवली ग्रामपंचायती प्रमाणेच अन्य किती ग्रामपंचायतींनी अशा बेकायदेशीर बांधकामांविरोधात कारवाई करण्याबाबत शासनाला कळविले आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बनावट सातबारे तयार करुन बेकायदेशीर बांधकामे करणाऱ्यांवर व या बेकायदेशीर बांधकामांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) तहसिलदारांकडून अशा प्रकारे शासनाला कळविण्यात आल्याचे दिसून येत नाही.

(२), (३), (४), (५) व (६) सन १९९६-९७ साली मौजे म्हातवली ता.उरण येथील गा.न.नं ७/१२ चे पुनर्लेखन करताना जुना गोसपाडा गावठाणाचे सहा ऐवजी सात हिस्से नजर चुकीने लिहिले असल्याचे आढळ्ल्याने तहसीलदार, उरण यांनी महाराष्ट्र महसूल जमीन संहिता १९६६ चे कलम १५५ नुसार संबंधित स.नं.९५/० चा गा.न.नं ७/१२ रद्य करण्याचे आदेश दिनांक १०.११.२०१७ रोजी पारीत केले आहेत. त्यानुसार मौजे म्हातवली येथील सर्वे नं ९५/० हा गा.न.नं ७/१२ उतारा रद्द करण्यात आला असून सदरचे क्षेत्र हे ग्रामपंचायतीच्या गावठाण क्षेत्रात येत असल्याने त्यावर करावयाच्या बांधकामाकरीता ग्रामपंचायतीने दिलेला ना-हरकत दाखला व त्यावर सुरु असलेले बेकायदेशीर बांधकाम याबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती, उरण यांना तातडीने कार्यवाही करण्याबाबत तहसिलदार यांनी कळविले आहे. त्या अनुषंगाने ग्रामपंचायत, म्हातवली यांनी दिनांक २४.०४.२०१७ रोजी बांधकामासाठी दिलेला ना-हरकत दाखला दिनांक २८.११.२०१७ रोजी रद्द केला आहे. सदरचे क्षेत्र हे गावठाणात येत असल्याचे तहसीलदार, उरण यांनी कळविल्यानुसार संबधीत विकासकाने दिनांक ३०.११.२०१७ रोजी ग्रामपंचायतीस केलेल्या अर्जावरुन ग्रामपंचायत म्हातवली येथील मासिक सभा दिनांक ०८.१२.२०१७ रोजीच्या ठरावानुसार सदर विकासकास G+२ इमारत बांधण्यास ना-हरकत दाखला दिला आहे, अशी वस्तुस्थिती आहे.

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उरण यांनी त्यांच्या दिनांक ०३.०३.२०१८ रोजीच्या पत्रान्वये सर्वे नं ९५/० हा रद्द झाल्याने संबधीत विकासकाने जे बांधकाम केले आहे ती जागा सिटी सर्वे कडून मोजून घेऊन व जागेच्या मालकीसंबधी खात्री होईपर्यंत इमारतीचे बांधकाम थाबविण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी असे सरपंच / ग्रामसेवक ग्रामपंचायत म्हातवली यांना कळविलेले आहे.

-----------------

## संग्रामपूर (जि.बुलढाणा) तालुक्यात सन २०१४-२०१५ मध्ये झालेल्या गारपीटीची नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(२८) * १०५३३६ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संग्रामपूर (जि.बुलढाणा) तालुक्यात सन २०१४-१५ मध्ये वादळ-वाऱ्यासह गारपीट झाल्याने एकलारा, बानोदा बुद्रूक व काटोलसह बहुसंख्य गावातील उभ्या पिकांचे प्रचंड नुकसान झाल्याने महसूल विभागाद्वारे पंचनामे करुन वरिष्ठांकडे अहवाल पाठविण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचनामा केलेल्या एकलारा, बानोदा बुद्रूक व काटोल येथील शेतकऱ्यांना गारपीटीची मदत न मिळाल्याने येथील शेतकऱ्यांनी दिनांक २८ डिसेंबर, २०१७ पासून तहसिल कार्यालयासमोर महामुक्काम आंदोलन सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती उपरोक्त गावातील तसेच नुकसान झालेल्या इतर गावातील नागरिकांना गारपीटीने झालेल्या नुकसानाची मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय.

(३) व (४) शासन निर्णय दि.११.०३.२०१६ व दि.०१.०६.२०१७ अन्वये, राज्यात सन २०१४ व सन २०१५ मध्ये झालेल्या अवेळी पऊस व गारपीटीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना अर्थसहाय्य करण्यासाठी निधी वितरीत करण्यात

आलेला आहे. त्यानुसार बुलडाणा जिल्ह्यास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अनुदान वाटपाची कार्यवाही तहसिल स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड, रत्नागिरी व सिंधदुर्ग जिल्ह्यातून जाणाऱ्या सागरी महामार्गाबाबत

**(२९) * १०५६६७ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड, रत्नागिरी व सिंधदुर्ग जिल्ह्यातून जाणाऱ्या ५७० किलोमीटर लांबीच्या सागरी महामार्गाचे काम रखडले असून सदर रस्त्याबाबत वर्षभरापूर्वी ड्रोन कॅमेऱ्याच्या माध्यमातून सर्वेक्षण करण्यात आलेले असतांनाही अद्याप या रस्त्याचा विकास आराखडाही तयार झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्यासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून दिला जात नसल्यामुळे रस्त्याचे काम रखडले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार सदर रस्त्याच्या कामासाठी निधीची तरतूद करून तातडीने सागरी महामार्गाच्या कामास सुरुवात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने रेवस बंदर ते आरोंदा ह्या रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातून जाणाऱ्या ५४० कि.मी. लांबीच्या सागरी महामार्गाला राष्ट्रीय महामार्ग म्हणून तत्वत: मान्यता दिली आहे. त्यानंतर केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्यावतीने सा.बां.विभागाकडून ह्या ५४० कि.मी. लांबीच्या सागरी महामार्गाच्या सुधारणेसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सन २०१६-१७ मध्ये चार भागात सल्लागारांमार्फत हाती घेतलेले असून रस्त्याचे सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले आहे. सद्यस्थितीत सल्लागारांमार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून

त्याच्या छाननीनंतर सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाला मंजुरीसाठी सादर करण्यात येईल. त्यानंतर केंद्र शासनाची मंजुरी प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

तथापि, केंद्रीय रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालयाच्या 'भारतमाला परियोजना फेज १" मध्ये या सागरी महामार्गाचा समावेश असून त्याची अंमलबजावणी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत करण्यात येणार आहे.

उपरोक्त बाब विचारात घेता उपरोक्त रस्त्यासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करुन दिला जात नसल्यामुळे रस्त्याचे काम रखडले आहे, हे म्हणणे वस्तुस्थितीला धरुन नसल्याचे स्पष्ट होते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालम (जि.परभणी) तालुक्यातील शेतकऱ्यांना रिलायन्स विमा कंपनीने विमा नाकारल्याबाबत

**(३०) * ११००६२ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालम (जि.परभणी) तालुक्यातील १०६७ शेतकऱ्यांनी दिनांक ३१ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास राष्ट्रीयकृत बँकांसह जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या शाखेत खरीप हंगामातील पीक विमा भरलेला असतांना रिलायन्स विमा कंपनीने त्यांचा विमा नाकारला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने मुदतवाढ दिलेली असतानाही उक्त शेतकऱ्यांचा विमा रिलायन्स कंपनीकडून स्वीकारण्यात न आल्याने शेतकऱ्यांना विमा योजनेपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तालुक्यातील या शेतकऱ्यांना विमा नाकारण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरचे शेतकरी पिक विमा योजनेपासून वंचित राहू नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक ३१ जुलै २०१७ पर्यन्त सादर केलेले सर्व विमा प्रस्ताव विमा कंपनीकडून स्विकारण्यात आले आहेत. तथापि, १ ऑगस्ट २०१७ रोजी वाढीव मुदतीत बँकेने स्विकारलेले प्रस्ताव विमा कंपनीने स्विकारले नाहीत.

(२) हे खरे नाही.

शासन निर्णय क्र. प्रपिवियो/२०१७/प्रक्र.१/११-अे दि. १/८/२०१७ अन्वये प्रधानमंत्री पिक विमा योजना अंतर्गत शेतकरी सहभागाची मुदत ५ ऑगस्ट, २०१७ पर्यत वाढविण्यात आली होती व या कालावधीत बँकांनी शेतक-यांचे विमा प्रस्ताव स्वीकारुन त्याची नोंदणी स्वतंत्र ठेवणेबाबत कळविण्यात आले. त्यानुसार १ ऑगस्ट २०१७ रोजी परभणी व हिंगोली जिल्हयात बँकांनी शेतकऱ्यांकडून विमा प्रस्ताव स्विकारले होते. त्यानंतर वरील नमुद शासन निर्णय अधिक्रमित करुन सुधारित समक्रमांकाचा शासन निर्णय दि. १/८/२०१७ रोजी निर्गमित करण्यात आला. त्यानुसार सहभागाची मुदत ४ ऑगस्ट पर्यन्त वाढविण्यात आली व या कालावधीत फक्त ऑनलाईन पध्दतीने आपले सरकार सेवा केंद्रामार्फत किंवा स्वत: शेतकऱ्यांनी थेट भरलेले अर्ज मान्य करण्यात यावेत अशा सूचना देण्यात आल्या त्यानुसार प्राप्त प्रस्ताव विमा कंपनीने स्विकारले आहेत. दि. १ ऑगस्ट २०१७ रोजी बँकामार्फत स्वीकारण्यात आलेल्या विमा प्रस्तावांचा एकत्रित अहवाल जिल्हाधिकारी परभणी यांचेकडुन मागविण्यात आलेला आहे.

(३) शेतकऱ्यांचा विमा नाकारण्यात आला नसुन दि. १ ऑगस्ट २०१७ रोजी बँकामार्फत स्वीकारण्यात आलेल्या विमा प्रस्तावांचा एकत्रित अहवाल जिल्हाधिकारी परभणी यांचेकडुन मागविण्यात आलेला आहे.

(४) दि. १ ऑगस्ट, २०१७ रोजी बँकामार्फत स्वीकारण्यात आलेल्या विमा प्रस्तावांचा एकत्रित अहवाल जिल्हाधिकारी परभणी यांचेकडुन मागविण्यात आलेला आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासन स्तरावरुन कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भातकुली ते कुमागढ (ता.भातकुली, जि.अमरावती) या रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत

**(३१) * ११४८५१ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भातकुली ते कुमागढ (ता.भातकुली, जि.अमरावती) या ५ कि.मी. रस्त्याचे बांधकाम अर्धवट स्थितीत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याचे काम अपूर्ण असल्यामुळे रस्त्यावरून प्रवास करणे गैरसोयीचे झाले असून रस्त्याअभावी पावसाळ्यामध्ये अनेक गावांतील नागरिकांचा एकमेकांशी होणारा संपर्क तुटणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्नांकित रस्त्याच्या पुनर्बांधणीच्या कामास मंजूरी प्राप्त असून कामासाठी निविदा निश्चितीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. निविदा निश्चित करून रस्त्याचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## मौजे नेरे (ता.मुळशी, जि.पुणे) येथील जमिनीच्या गैरव्यवहाराबाबत

**(३२) * ११२१३० श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळशी (जि.पुणे) तालुक्यातील कासारसाई प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील प्रकल्पग्रगस्तांना पर्यायी जमीन म्हणून मौजे नेरे येथील जमीन मंजूर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जमीन तत्कालीन अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या बनावट स्वाक्षरी आणि चलनांद्वारे बनावट प्रकल्पग्रस्तांना देण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदर जमीन ताब्यात घेवून संबंधित दोषी बनावट प्रकल्पग्रस्त व संबंधित अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) याबाबत संबंधित आदेश, चलन, स्वाक्षरी व इतर कागद पत्रांबाबत साशंकता असलेने, शहानिशा करणेचे काम चालू आहे.

(४) सदर प्रकरणमध्ये सकृतदर्शनी तथ्य आढळून आल्याने, सदर जमिनीबाबत अपर जिल्हाधिकारी, पुणे यांनी दि. ०५.०१.२०१८ च्या आदेशान्वये सदर जमिनीबाबतचे संदिग्ध आदेश रद्द केले असून ७/१२ चे अधिकार अभिलेखामध्ये जिल्हाधिकारी तथा उपसंचालक पुनर्वसन (जमिन), पुणे यांचे नावे दाखल करणेत आलेले आहे.

सदर प्रकरणाबाबत चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर जिल्हयातील भूकंपग्रस्त 'क' वर्गवारीच्या गावातील घरे व गायरान भूखंड नियमित करण्याबाबत

**(३३) * १११७७२ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील भूकंपग्रस्त ‘क’ वर्गवारीच्या गावातील गावठाणालगतचे खाजगी व शासकीय गायरान भूखंड नियमित करण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, लातूर यांनी दिनांक १६ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास सचिव, महसूल विभाग यांच्याकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावातील तत्कालीन आपत्कालीन स्थितीत घराला तडे गेल्याने नागरिकांनी अनोंदणीकृत पद्धतीने अनेक खरेदी व्यवहार केल्यामुळे भोगवटा असूनही मालकी नसल्यामुळे या कुटुंबांना शासनाच्या आवास योजना तसेच बँकेचे कर्ज मंजूर होत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील ‘क’ वर्गवारीच्या गावातील गावकऱ्यांचे घरे व गायरान भूखंड विशेष बाब म्हणून नियमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२), (३) व (४) लातूर जिल्ह्यातील भूकंपग्रस्त ‘क’ वर्गवारीच्या गावातील गावठाणालगतच्या खाजगी जमिनीतील अनोंदणीकृतपणे झालेले व्यवहार महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमानुकुलन, उन्नतीकरण व नियंत्रण) अधिनियम, २००१ मधील तरतूदीनुसार नियमानुकूल करण्याविषयी जिल्हाधिकारी, लातूर यांनी दि. ३१.०१.२०१८ रोजी आदेश पारित केलेले असून असे भूखंड नियमानुकूल करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी, लातूर कार्यालयाकडून सरकारी गायरान जमिनीवरील अतिक्रमण नियमित करण्यासाठी दि. १६.११.२०१७ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने विहीत नमून्यात व विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार सर्व अनुषंगिक कागदपत्रांसह नियमाप्रमाणे सविस्तर प्रस्ताव सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, लातूर यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## समुद्रपूर (जि.वर्धा) तालुक्यातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(३४) * ११०८२१ श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समुद्रपूर (जि.वर्धा) तालुक्यातील कोरा-नंदोरी, कोरा-गिरड, कोरा-चिमूर आणि कोरा-खापरी या रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाल्यामुळे या रस्त्यावर होणाऱ्या अपघातांच्या प्रमाणात वाढ झाली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रदीर्घ कालावधीपासून या रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आली नसून या रस्त्यांच्या दुरुस्तीकडे संबंधित विभागाचे अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याने येथील नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोरा-नंदोरी, कोरा-गिरड, कोरा-चिमूर आणि कोरा-खापरी या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्रश्नांकित लांबीत कोणताही अपघात रस्त्यांच्या दोषामुळे झालेला नाही, अशी नोंद पोलिस दप्तरी आहे.

(२) अशी बाब नाही.

रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) व (५) प्रश्नांकित रस्ता नांदोरी-कोरा-गिरड रा.मा. ३२२ व गिरड-कोरा-खापरी प्रजिमा २५ चा भाग आहे. या दोन्ही रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे. रस्त्याच्या इतर आवश्यक दुरुस्तीची कामे हि निधीच्या उपलब्धते नुसार व आवश्यकते प्रमाणे करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील पैनगंगा नदीच्या पुरामुळे बाधीत झालेल्या गावांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(३५) * १०७६८४ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील पैनगंगा नदीच्या परिसरातील गावांमध्ये पुराचे पाणी मोठ्या प्रमाणात शिरत असल्याने या पूरबाधित गावांच्या पुनवर्सनाचा प्रश्न सन २००६ पासून शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील गावातील ग्रामस्थांनी शासनाकडे वारंवार मागणी करुनही पुनर्वसनाकडे शासन दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार ११ वर्षापासून प्रलंबित असलेल्या पैनगंगा नदीच्या परिसरातील पूरबाधित गावांच्या पुनर्वसनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) शासन निर्णय ९ जानेवारी, २००६ च्या अनुषंगाने सन २००५ मधील अतिवृष्टी व पूर यामूळे बाधित गावांचे पुनर्वसन, घरदुरुस्ती, घरांची पुर्नबांधणी, नागरी सुविधा इ. बाबत धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार सर्व प्रस्ताव हे संपुर्ण पुनर्वसन लाभधारकांना फक्त घरबांधणी अनुदान देऊन करण्याचे धोरण आहे. परंतु बुलढाणा जिल्ह्यातील पैनगंगा नदीला आलेल्या पुरामुळे बाधित झालेल्या ४ गांवाचे पुनर्वसन करावयाचा प्रस्तावावर शासनाचे धोरण ठरलेले नाही. सर्वकष धोरण तयार करणे शासनस्तरावर विचाराधिन आहे.

-----------------

## धुळे शहरातील कापडणे फाट्यापर्यंतच्या चौपदरी रस्त्यासाठी सर्व्हीस रोड व देवमाने फाटयावर उड्डाणपूल बांधण्याबाबत

**(३६) * १०५७८४ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरातील सोनगीर टोल नाक्यापासून कापडणे फाटयापर्यंत चौपदरी रस्त्याचे काम पूर्ण होऊन आठ वर्षे झाली असताना अद्यापपर्यंत या रस्त्यासाठी सर्व्हीस रोड व देवमाने फाट्यावर उड्डाणपूल बांधला नसल्याने येथे अनेक अपघात होऊन या अपघातांमध्ये ४५ नागरीकांचे मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त रस्त्यावरील अपघात थांबविण्यासाठी सर्व्हीस रोड तसेच देवमाने फाट्यावर उड्डाणपुलाचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) सदर अपघाताची सविस्तर चौकशी करुन अपघातातील दोषी चालकांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात आली असल्याचे पोलीस उपअधीक्षक, नियंत्रण कक्ष, अप्पर पोलिस महासंचालक (वा.) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी कळविले आहे.

(३) केंद्र शासनाच्या रस्ते, वाहतूक व महामार्ग मंत्रालय यांच्या वतीने भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्यामार्फत महाराष्ट्र ते मध्य प्रदेश सीमा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम प्रगतीत आहे. सदर प्रकल्पातील सोनगीर ते कापडणे लांबीतील काम पूर्ण झालेले असून कापडणे/

देवमाने येथील उड्डाणपूल व सर्व्हिस रोडचे बांधकाम सदर महामार्गाच्या सहापदरीकरणाच्या प्रकल्पात प्रस्तावित करण्यात आल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,धुळे यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवेदर नवगाव व राऊतआळी (जि.रायगड) येथे धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्याबाबत

**(३७) * १०८५६७ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.संजय कदम (दापोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी, रायगड व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील समुद्र किनाऱ्यावरील अनेक गावांमध्ये सागरी धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्याबाबत शासनाची मंजूरी मिळाली असताना सीआरझेड कायद्यातील जाचक तरतुदीमुळे या बंधाऱ्यांचे बांधकाम रखडले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवेदर नवगाव (ता.अलिबाग, जि.रायगड) येथे २ कि.मी. लांबीचा समुद्र किनारा असून या किनाऱ्यावर काही ठिकाणी सुमारे २० वर्षांपूर्वी सागरी धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्यात आला असल्याने येथे बंधारा बांधण्याची तसेच मौजे असगोली (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथेही बंधारा बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे डिसेंबर, २०१७ मध्ये आलेल्या ओखी चक्रीवादळामुळे व समुद्राच्या भरतीच्या लाटांमुळे सदर बंधारा फुटल्याचे तसेच राऊतआळी या गावात बंधारा नसल्याने समुद्राचे पाणी गावात शिरून गावकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत स्पष्टीकरण देताना किनारा अभियंता, बांद्रा (पूर्व) मुंबई यांनी स्पष्ट केले की पर्यावरण विभागाने अद्याप परवानगी न दिल्याने सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात लेखाशिर्ष ४७११ अंतर्गत रूपये ३ कोटी

मंजूर झालेले असूनही उक्त ठिकाणच्या बंधाऱ्यांचे बांधकाम करता आले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी करून व भविष्यातील धोक्याची शक्यता लक्षात घेऊन नवेदर नवगाव, राऊतआळी व असगोली येथील तसेच रत्नागिरी, रायगड व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक ठिकाणच्या धूप प्रतिबंधक बंधाऱ्यास पर्यावरण (सीआरझेड) विभागाची मान्यता प्राप्त करून तातडीने बंधाऱ्याचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) राऊतआळी येथे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बंधारा बांधण्यात आलेला नसून अस्तित्वातील नैसर्गिक मातीच्या बंधाऱ्याला ओखी वादळामुळे दोन ठिकाणी भगदाड पडून राऊतआळी गावातील मोकळ्या जागेत पाणी शिरले होते. गावकऱ्यांचे कोणतेही नुकसान झाले नसल्याचे अलिबाग तहसिलदार यांनी कळविले आहे.

(४) नवेदर नवगाव, जि.रायगड येथे ३०० मी. लांबीचा धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्याचे रु.३.०० कोटी अंदाजित किंमतीचे काम सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात समाविष्ठ करण्यात आले असून सन २०१७-१८ मध्ये रु.५१.६३ लक्ष तरतूद आहे. तथापि, किनारपट्टी नियमन क्षेत्र अधिनियम २०११ नुसार (CRZ) मंजूरी प्रलंबित असल्याने हे काम अद्याप हाती घेण्यात आलेले नाही.

(५) सन २०१६-१७ च्या ४९ कामांपैकी ४६ कामांचे प्रस्ताव MCZMA कडे CRZ मंजूरीसाठी सादर करण्यात आली असता सदर कामांबाबत विविध बैठकांमध्ये चर्चा होऊन यापैकी १३ कामांची SEIAA या समितीकडे शिफारस करण्यात आली. सद्य:स्थितीत CRZ मंजूरीसाठी राष्ट्रीय हरीत लवाद (NGT) ची स्थगिती असून ही स्थगिती १८ जुलै, २०१८ पर्यंत लागू आहे. त्यामुळे CRZ मंजूरीअभावी एकही काम हाती घेता आलेले नाही.

MCZMA कडे CRZ मंजूरीसाठी नवेदर नवगाव या कामाचा समावेश असून असगोली जि.रत्नागिरी हे काम सन २०१८-१९ च्या

अर्थसंकल्पात निधीच्या उपलब्धतेनुसार समाविष्ठ करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील ठिबक सिंचन संचाच्या अनुदानात झालेला गैरव्यवहार

**(३८) * ११३१९४ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या नावे बनावट कागदपत्रे तयार करून ठिबक सिंचन संचाचे अनुदान बळकावल्या प्रकरणी इंगळे समितीचा अहवाल शासनाकडे माहे नोव्हेंबर, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात सादर करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठिबक सिंचन संचाच्या अनुदानामध्ये १० कोटी ५० लक्ष रूपयांचा अपहार केल्याचे समितीने निदर्शनास आणल्याने शासनाने गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर खटले दाखल करण्याचे लेखी आदेश दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणातील ३५ अधिकाऱ्यांसह अन्य दोषी अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियानांतर्गत सन २००७-०८ ते सन २०११-१२ या कालावधीत ता. माळशिरस जि.सोलापूर येथे झालेल्या अनियमितते प्रकरणी श्री.इंगळे समितीचा अंतरीम पुरक अहवाल क्रमांक-२ आयुक्त (कृषि) यांनी दि.२९.७.२०१७ अन्वये शासनास सादर केला आहे. त्या अहवालानुसार रु.१०.५७ कोटी इतकी रक्कम आक्षेपार्ह दर्शविण्यात आली आहे. सदर गैरव्यवहार प्रकरणी डॉ.सु.ल.जाधव समितीचा अहवाल व श्री.इंगळे समितीचा पुरक अहवाल क्र.१ व २ अनुसार आढळून आलेल्या

अनियमितता व गैरव्यवहारास जबाबदार सर्व संबंधितांविरुध्द प्रथम खबरी अहवाल (F.I.R.) दाखल करण्यास आयुक्त (कृषि) यांना दि.८.९.२०१७ अन्वये शासनाने परवानगी दिली आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी दोषी आढळून आलेल्या एकूण ७ अधिकाऱ्यांविरुध्द दि.२.४.२०१४ च्या ज्ञापनान्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. उपरोक्त दोन्ही पुरक अहवालांमध्ये सकृतदर्शनी जबाबदार एकूण ३३ अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वेखंडवाडी (ता.पाटण, जि.सातारा) येथील गावठाणांस तारळी प्रकल्पाच्या पुनर्वसीत वसाहतीचा दर्जा व नागरी सुविधा देण्याबाबत

**(३९) * १०८७८० श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कुशी (ता.पाटण, जि.सातारा) या गावातील तारळी धरण प्रकल्पात बाधीत झालेल्या २१ प्रकल्पग्रस्तांना मायणी (ता.खटाव) या ठिकाणी पुनर्वसनाकरीता भूखंडाचे वाटप करण्यात आले असता या प्रकल्पग्रस्तांना हे मान्य नसल्याने या प्रकल्पग्रस्तांनी भूखंड व जमिनीचा ताबा न घेता तालुक्यातीलच वेखंडवाडी याठिकाणी स्वखर्चाने जमिन खरेदी करुन गावठाण वसविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मायणी (ता.खटाव) हे ठिकाण पुनर्वसनाकरीता सोयीचे नसल्याने आणि देण्यात आलेल्या जमिनी नापिक असल्याने वेखंडवाडी (ता.पाटण) याठिकाणी स्वखर्चाने जमिन खरेदी करुन वसविलेल्या गावठाणांस विशेष बाब म्हणून मंजूरी व १८ नागरी सुविधा देण्याबाबत प्रकल्पग्रस्तांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाची कोणतीही परवानगी न घेता वेखंडवाडी (ता.पाटण) येथे जमीन खरेदी करुन गावठाण वसविल्याने या गावठाणांस पुनर्वसन गावठाण म्हणून मंजूरी देणे योग्य होणार नसल्याचा अहवाल उपजिल्हाधिकारी पुनर्वसन सातारा यांनी उपआयुक्त (पुनर्वसन), पुणे विभाग, पुणे यांना सादर केला असल्याने वेखंडवाडी येथील कुशी प्रकल्पग्रस्तांच्या

गावठाणास अद्यापही पुनर्वसाहतीचा दर्जा मिळाला नसल्याचे तसेच यामुळे या प्रकल्पग्रस्तांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार वेखंडवाडी येथील गावठाण या २१ प्रकल्पग्रस्तांसाठी विशेष बाब म्हणून मंजूर करुन त्यास पुनर्वसाहतीचा दर्जा व १८ नागरी सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) पुनर्वसनाकरीता सोयी नाहीत व जमीन नापिक आहे हे म्हणणे खरे नाही, तथापि, वेखंडवाडी येथील २१ प्रकल्पग्रस्तांनी वसाहतीस गावठाणाचा दर्जा मिळण्याबाबत मागणी केली आहे. हे खरे आहे.

(३) सदर गावठाणाचे पुनर्वसन नियोजन मौजे मायणी ता. खटाव येथे करुन या लाभक्षेत्र गावातच प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन देणे योग्य होईल. असा अहवाल जिल्हापुनर्वसन कार्यालय, सातारा यांचेकडून दि. २६.१२.२०१६ रोजी विभागीय आयुक्त, पुणे यांना सादर करण्यात आला आहे.

(४) व (५) विभागीय आयुक्त पुणे यांचे कार्यालयाकडील दिनांक २८.६.२०१७ रोजीच्या पत्रान्वये वसाहतीस पुनर्वसित दर्जा मिळणेबाबतचा प्रस्ताव अमान्य केला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील ४८ गावांमध्ये बस सेवा सुरु करण्याबाबत

**(४०) * ११२९०८ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील ४८ गावांमध्ये “रस्ता तिथे एसटी” हे ब्रीद असलेल्या राज्य परिवहन महामंडळाची एसटी पोहचली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती या गावांमध्ये बस सेवा तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.
(२) व (३) मेहकर तालुक्यात १४० गावे असून त्यापैकी बहुतांशी गावांना महामंडळाची थेट बससेवा उपलब्ध आहे व काही गावे महामंडळाची बससेवा सुरु असलेल्या मार्गावरील फाट्यापासून ० ते ३ कि.मी. च्या अंतरावर आहेत.

तसेच, मेहकर तालुक्यातील काही गावांचे रस्ते राज्य परिवहन प्रवासी वाहतूकीस योग्य नसल्यामुळे सदर मार्गांवर वाहतूक सुरु करणे शक्य झालेले नाही. त्यापैकी ११ गावांना प्रवासी वाहतूक सुरु करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद, बुलढाणा व सार्वजनिक बांधकाम विभाग यांना राज्य परिवहन महामंडळाद्वारे दि.०६.०९.२०१७ च्या पत्रान्वये सदर गावांतील रस्ते राज्य परिवहन महामंडळाच्या प्रवासी वाहतूकीस योग्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्याची मागणी करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे वानीवडे-सरवणकरवाडी (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील धूप प्रतिबंधक बंधाऱ्याच्या बांधकामाबाबत

**(४१) * ११४२५५ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वानीवडे-सरवणकरवाडी (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे काम राज्य स्तरीय योजना ४७११ पूरनियंत्रण प्रकल्प यावरील भांडवली खर्चाअंतर्गत सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आले असून सदर कामाच्या रूपये १ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बंधाऱ्याच्या कामासाठी सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येऊनही बंधाऱ्याच्या कामास सुरूवात झालेली नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार या बंधाऱ्याच्या कामास सुरूवात करून तातडीने काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे. मौजे वानीवडे-सरवणकरवाडी येथील कामाला रु.१.०० कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात रु.२१.७४ लक्ष व सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात रु.१७.२१ लक्ष इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. तथापि, पर्यावरण विभागाची CRZ मंजूरी प्राप्त नसल्याने पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) पर्यावरण विभागाची CRZ परवानगी प्राप्त होताच सदर काम करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वडूज-खातर-खटाव-तडावळे-बोंबले-वनपुरी (ता.खटाव, जि.सातारा) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(४२) * ११२४९९ श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडूज-खातर-खटाव-तडावळे-बोंबले-वनपुरी (ता.खटाव, जि.सातारा) या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे रस्त्यावरून प्रवास करणे गैरसोयीचे झाले असून या रस्त्याच्या दुरुस्तीकडे संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झाले असल्याचे

माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दहिवाडी-माईनी या रस्त्यावरील खड्डे बुझविण्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही रस्त्यांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार वडूज-खातर-खटाव-तडावळे-बोंबले-वनपुरी या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत तसेच दहिवाडी-माईनी या रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खानवटे (ता.दौंड, जि.पुणे) येथील प्रकल्पग्रस्त कुटुंबांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(४३) * ११३३२२ श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानवटे (ता.दौंड, जि.पुणे) येथील तलांक ५०० ते ५०४ मधील सुमारे ७० कुटुंबांची घरे शासन निर्णय क्र.३४९१/प्र.क्र.-९१/र-४ दि.०७/११/१९९४ नुसार संपादन झालेली असून सदर कुटुंबांना निवासी भूखंड अद्‌याप मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच ठिकाणच्या उर्वरित १२८ घरांचे तलांक ५०४ ते ५०७ मधील पुनर्वसनासाठी जिल्हा पुनर्वसन कार्यालय, पुणे यांचेमार्फत पत्र क्र. जि.पु.अ/उजनी/वशी/१२९/२००० दि.२९/०१/२००१, कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई यांना पाठविण्यात आले असून त्यावर देखील

अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नसून सदर कागदपत्रेच गहाळ झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुनर्वसनापासून वंचित राहिलेल्या ७० कुटुंबाना निवासी भूखंड मिळणेबाबत व १२८ कुटुंबांची कागदपत्रे गहाळ झाल्यामुळे त्यांचे पुनर्वसन तातडीने करण्याची मागणी जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचेकडे लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत व निवासी भूखंड देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. ७० कुटुंबांपैकी ८ कुटुंबांना निवासी कारणासाठी भूखंडाचे वाटप करणेत आलेले आहे.

(२) सदरच्या पत्राविषयीच्या संचिकेचा अभिलेखात शोध घेतला असता सदरची संचिका आढळून आलेली नाही. परंतु या पत्राची प्रत संबंधित लोकप्रतिनिधी यांनी जिल्हा पुनर्वसन कार्यालय, पुणे यांच्याकडे समक्ष दिलेली आहे.

(३) होय, हे खरे आहे

(४) सदर प्रकरणी प्रकल्पग्रस्तांची मागणी तपासून कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कृषी आयुक्तालयाच्या भरारी पथकांनी किटकनाशकांचा अवैध साठा जप्त केल्याबाबत

**(४४) * १०५०१२ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर कृषी सहसंचालक कार्यालयातील गुण नियंत्रण विभागाच्या अधिकाऱ्यांनी चिकुर्डे (ता.वाळवा, जि.सांगली) येथील ओंकार कृषी सेवा

केंद्रावर टाकलेल्या धाडीत बनावट स्टेप्टोसायक्लिन या जीवाणूनाशकाचा साठा माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान जप्त केला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अकोला, सांगली, जळगांवसह राज्यातील विविध ठिकाणी शासनाच्या कृषी आयुक्तालयाच्या भरारी पथकांनी धाडी टाकून २ कोटी २३ लाख रुपये किंमतीचा किटकनाशकांचा अवैध साठा जप्त केला असल्याचे दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती विनापरवाना तसेच कालबाहय किटकनाशके व रासायनिक खते विक्री करणाऱ्या दुकानांवर तसेच उत्पादन करणाऱ्या कंपन्यावर फौजदारी गुन्हे दाखल करुन त्यांच्यावर दोषारोपपत्र दाखल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

कृषि आयुक्तालयाच्या भरारी पथकाने धाडी टाकून सांगली जिल्हयामध्ये रासायनिक खताचा रु. ३३.५९ लाख मुल्य रक्कमेचा अवैध साठा जप्त केलेला आहे.

तसेच, अकोला येथे किटकनाशकांचा रु.२०२ लाख मुल्य रक्कमेचा अवैध साठा जप्त केलेला आहे.

(३) होय.

(४) सांगली जिल्ह्यामध्ये फौजदारी गुन्हे दाखल असून दोषारोप पत्र दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच अकोला जिल्ह्यामध्ये सहा कीटकनाशके उत्पादकांवर गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांनी कोर्ट केसेस दाखल केलेल्या असून सदरची प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धुळे जिल्ह्यातील दगड खाणीसाठी दिलेल्या जमिनींबाबत

**(४५) * १०५०६८ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील दगड खाणीसाठी वर्ग असलेले २०७ हेक्टर जमिनीचे क्षेत्र महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी नियमांचे उल्लंघन करुन वाटप केल्याप्रकरणी लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री व सचिव, महसूल विभाग यांचेकडे तक्रार केल्यानंतर या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश विभागीय आयुक्तांना देण्यात आल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त चौकशीमध्ये सफारी गार्डनसाठी प्रस्तावित असलेल्या सर्वे क्र.५०१ व ५१० मध्ये ९८ कोटी ५० लाख रुपयांचे शासनाचे नुकसान झाल्याचा निष्कर्ष काढण्यात आला असून सन २०१२ ते २०१४ या कालावधीत दगड खाणींकडे वर्ग केलेल्या २०७ हेक्टर जमिनीचे वाटप बेकायदेशीररित्या केल्याने एकूण १३५ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच धुळे जिल्ह्यातील भूमाफियांनी राष्ट्रीय महामार्ग क्र.६ च्या रुंदीकरणामध्ये त्यांची जमीन संपादित केली नसतानाही बनावट सातबारे तयार करुन शासनाची १३ कोटी २९ लाख रुपयांची फसवणूक केल्यामुळे नवापूर ते फागणे या ११५ कि.मी. लांबीतील जमिनी अधिग्रहणाच्या तपासाचे आदेशही देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व प्रकरणी चौकशी करून धुळे जिल्हयातील दगड खाणीसाठी बेकायदेशीर जमीन वाटप करणाऱ्या अधिकाऱ्यांवर तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र.६ च्या रुंदीकरणामध्ये बनावट सातबारे तयार करुन शासनाची फसवणूक करणाऱ्या भूमाफियांवर व संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशा आशयाची तक्रार लोकप्रतिनिधींनी दिनांक २७/११/२०१७ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री यांना केल्यानंतर विभागीय आयुक्त,नाशिक यांना स्वत: चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

(२) सदर विषयाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी त्यांच्या दिनांक २८/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये चौकशी अहवाल सादर केला आहे. सदर अहवालात धुळे शहरातील स.क्र.५०१ व ५१० मधील खातेदारांना वाटप केलेली सरकारी जमीन स्वत: कसली नाही किंवा लागवडीखाली आणली नाही, त्यामुळे शर्तभंग झाल्याने ४२ खातेदार मिळून १११ हे. १.३६ आर क्षेत्र शासन जमा करण्यास पात्र असल्याबाबत व या सर्व जमिनीचे सध्याचे मुल्यांकन रु. ९८,५०,११,२८८/- असुन सकृतदर्शनी शासनास सदर रकमेची हानी झाली असल्याबाबत अहवालात नमुद केले आहे.

(३) विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या दिनांक २८/१२/२०१७ रोजीच्या चौकशी अहवालानुसार राष्ट्रीय महामार्ग क्र.६ यासाठी सर्व्हे नंबर ५०१ मधील १२९०० चौ.मि. इतके क्षेत्र आणि सर्व्हे नंबर ५१० मधील २०३३७ चौ.मि. इतके क्षेत्र असे एकूण ३३२३७ चौ.मि. इतके क्षेत्र भूसंपादीत केले आहे. यासाठी भूसंपादनाचे निवाडे मंजूर झाले असून सदर जमीन संपादीत करण्यासाठी रु.१३,२९,९२,६८७/- (अक्षरी तेरा कोटी एकोणतीस लक्ष ब्यान्नव हजार सहाशे सत्याऐंशी रु.मात्र) इतका मोबदला देय असल्याचे संबंधीत भूसंपादन अधिकारी यांनी निर्धारित केले आहे. यामध्ये सदर भूसंपादन हे राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ अन्वये असून लवाद प्रकरण केल्यानंतर या रक्कमेमध्ये वाढ होऊ शकते. त्यामध्ये अद्याप मोबदल्याचे वाटप करण्यात आलेले नाही व त्यामुळे प्रत्यक्षात चुकीच्या व्यक्तींना मोबदला देण्यात आला अशी वस्तुस्थिती नाही.

(४) विभागीय आयुक्त, नाशिक यांनी दिनांक २८/१२/२०१७ रोजी शासनास सादर केलेल्या चौकशी अहवालाची छाननी शासनस्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे वेळणेश्वर, कोंडकारूळ, बोऱ्या व तवसाळ (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) या गावांना समुद्रांच्या पाण्यामुळे निर्माण झालेला धोका

**(४६) * १०५८०३ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वेळणेश्वर, कोंडकारूळ, बोऱ्या, तवसाळ (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) या गावातील शेतजमिनी व किनाऱ्यावरील लोकांच्या घरांना दिनांक २५ जून ते ५ जुलै, २०१७ या कालावधीत समुद्राच्या उधाणाच्या भरतीच्या लाटांमुळे धोका निर्माण झाला होता. तसेच भविष्यात लगतच्या वेलदूर व अंजनवेल या गावातील नागरिकांच्या जिवितासही धोका होणार असल्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेस जयगड बंदर (ता.रत्नागिरी) येथील ब्रेक वॉटर वॉल कारणीभूत असल्याचे स्थानिक ग्रामस्थांचे म्हणणे असुन यासंबंधी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री तसेच मा.मदत व पुनर्वसन मंत्री यांचेकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) याबाबतचा अहवाल सी.डब्ल्यु.पी. आर.एस. पुणे यांचेकडून मागविण्यात आलेला आहे. अद्याप अहवाल प्राप्त झालेला नाही.

(२) अशा आशयाची पत्रे प्राप्त झाले हे खरे आहे.

(३) तवसाळ येथील २७५ मीटर लांबीच्या व रु.८५.४८ लक्ष किंमतीच्या धुपप्रतिबंधक बंधाऱ्याच्या १३व्या वित्त आयोगात मंजूर कामाची निविदा निश्चिती करण्यात आली आहे.

वेळणेश्वर येथील धूपप्रतिबंधक बंधाऱ्याच्या कामास किनारपट्टी नियमन क्षेत्र अधिनियम २०११ नुसार (CRZ) मान्यतेसाठी कार्यवाही सुरु असून मंजूरी प्राप्त होताच कार्यादेश देण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे सर्जेकोट-पीरवाडी (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील धूप प्रतिबंधक बंधाऱ्याच्या बांधकामाबाबत

**(४७) * ११४२५६ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सर्जेकोट-पीरवाडी (सुवर्णकडा) (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे काम राज्यस्तरीय योजना ४७११ पूरनियंत्रण प्रकल्प यावरील भांडवली खर्च अंतर्गत सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आले असून सदरहू कामाच्या रूपये १ कोटी ७५ लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यताही देण्यात आली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदरहू धूप प्रतिबंधक बंधाऱ्याच्या कामासाठी सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात ८ लाख ७५ हजार इतक्या रकमेची तरतूद केलेली असतानाही बंधाऱ्याच्या कामास अद्यापी सुरूवात करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त ठिकाणच्या धूप प्रतिबंधक बंधाऱ्याच्या बांधकामास सुरुवात करून तातडीने काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय. हे खरे आहे.

सर्जेकोट-पीरवाडी या कामासाठी CWPRS पुणे यांचेकडून काटछेद मागविण्यात आले आहेत. काटछेद प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात

येईल. तसेच सदर कामासाठी पर्यावरण विभागाच्या मंजूरीसाठी सल्लागार नेमणूकीसाठी निविदा मागविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) सदर कामासाठी पर्यावरण विभागाच्या मंजूरीसाठी निविदा मागविण्यात आली असून सल्लागाराची नियुक्ती करुन पर्यावरण विभागाची मंजूरी मिळताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.